॥ कट्यावरील गप्पा ॥

संध्याकाळी आम्ही मैत्रिणी नेहमी प्रमाणे कट्यावर जमलो होतो. गप्पागोष्टी हसणे चालू होते. तेवढ्यात आमचे लक्ष शेजारी बाकावर बसलेल्या वृद्ध जोडप्याकडे गेले.

ते दोघे आपसात बोलत होते. त्या बाई म्हणत होत्या अहो आज किती दिवस झाले मुलगा आपल्याशी बोलत नाही. तुमच्या लक्षात आलेय का? अहो आजू सकाळी मी त्याला हाक मारली, बाळ जरा इकडे ये. तर म्हणाला आई मला आत्ता वेळ नाही. नंतर येतो. असं एवढे काय काम असलं हो या मुलांना?

घरात सुनेला मदत करावी तर तेही तिला नको असते. मग आपण नुसते बसुन काय करायचे. कंटाळा येतो. नातवंडाशी जरा गप्पागोष्टी कराव्या तर ती सुद्धा त्यांच्या उद्योगा मध्ये बिझी असतात.

त्यावर आजोबा त्यांना म्हणाले अग हल्ली घरोघरी असेच असते. तेव्हा काही वाटायला नको. अग हल्ली या कॉम्प्युटर युगात नवीन तंत्रज्ञान पद्धती मुळे मुलानां ऑफीस मध्ये खूप काम असते. घरी असले तरी मोबाईलवरुन बाहेरच्या देशाशी पण त्यानां काम करावे लागते.

त्यांचे हे बोलणे ऐकल्यावर आमच्या मनांत विचार आला की त्यांची ही सकाळी उठल्या पासून धावपळ चालू असते. स्वयंपाक करुन मुलांचे आवरुन त्यांचे डबे भरुन द्यायचे. स्वतःचे सर्व आवरुन ऑफीसची वेळ गाठायची असते. त्यांच्या इतर अडचणी असु शकतात. त्यानांपण मनातून कळत असते की आपण आपल्या माणसांशी संवाद साधायला हवा. कळते पण वळत नाही. असो. पण आम्हाला असे वाटते की आजच्या या स्पर्धात्मक जिवनात दोघानीही समजून घेऊन एकमेकांशी संवाद साधला तर दोघांचे ही जीवन सुखावह होईल.



सुनिता श्रीधर पटवर्धन.
फोन नं. 9404413853